# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जावक क्रमांक: तंशिविकापु/विवि/महाडीबीटी-२०१८/२०१८/ 4479 दिनांक : २०.१०.२०१८

**परिपत्रक / महत्वाचे :**

प्रति,
प्राचार्य,
पुणे विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानीत
व खाजगी विनाअनुदानीत तांत्रिक व व्यावसायिक
अभ्यासक्रमाच्या (पदविका, पदवी व पदव्युत्तर) संस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म भरून घेणेबाबत...**

**संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक जा. क्र. तंशिविकापु/विवि/महाडीबीटी-२०१८/२०१८/४३७८ दि. ०९.१०.२०१८.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता तंत्रशिक्षण विभागाशी संबंधित **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनांकरीता** महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज दाखल करण्याकरीताच्या कार्यवाही व विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉगीनमधून अपलोड करावयाच्या कागदपत्रांची सूची संदर्भिय परिपत्रकासोबत जोडण्यात आलेली होती.

सदर सुचीमध्ये कुटूबांतील दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्यांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला असल्याबाबतचे कागदपत्रांसाठी शिधापत्रिका (राशन कार्ड) व पालकांचे हमीपत्र या दोन्ही कागदपत्रांची आवश्यकता असल्याबाबत नमूद करण्यात आले होते. या अनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यात येते की, उपरोक्त दोन कागदपत्रांपैकी कुटूबांतील दोन किंवा दोनपेक्षा कमी अपत्यांनी शासकीय योजनांचा लाभ घेतला असल्याबाबतचे पालकांचे हमीपत्र बंधनकारक असून सदर हमीपत्र विद्यार्थ्याने अपलोड केले असल्यास व त्यासोबत शिधापत्रिका (राशन कार्ड) जोडले नसल्यास असे शिष्यवृत्तीचे अर्ज विद्यार्थ्यास परत न पाठविता पुढील डेस्ककडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावेत.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

D:\Yogesh Kelkar\DBT\online application circular for non pilot_2017-18.docx